**महाराष्ट्रातील गावगाड्याचे चित्रण करणारे सिद्धगीरी ग्रामजीवन म्युझियम कणेरी (मठ)**

**शुभांगी प्रकाश गुरव** संशोधक विद्यार्थी इतिहास अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मो.नंबर:- ७३५०१४०४८५ ई. मेल:- guravshubhangi9@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम हे कोल्हापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध अशा कणेरी (मठ) येथे स्थित आहे. हे एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या परिपूर्ण असे संग्रहालय आहे. ज्यामध्ये शंभर वर्षापूर्वीच्या स्वयंपूर्ण अश्या खेड्यांचा / ग्रामीण जीवनाचा इतिहास मांडलेला आहे. सिद्धगीरी ग्रामजीवन मुझीयम मठाच्या निसर्गरम्य व आध्यात्मिक परिसरात असून ग्रामीण जीवनशैलीची तंतोतंत प्रतिकृती सिमेंटच्या मुर्तीद्वारे मांडण्याचा एक अनोखा प्रकल्प वास्तवात आणला आहे. २००६ मध्ये या म्युझियमची सुरवात श्री. अदृश्य काडसिध्देश्वर महाराज यांनी केली. हे म्युझियम महात्मा गांधीजींच्या 'ग्राम स्वराज्य' या संकल्पनेतून प्रेरित आहे. या म्युझियम मागील विचार 'ग्रामीण संस्कृती आणि भारतीय जीवनशैलीची माहिती जतन करणे' हा होता. सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम ७ ते ८ एकर क्षेत्रफळावर पसरलेले आहे. ग्रामीण जीवनातील प्रत्येक पैलू जवळजवळ मुख्य ८० दृश्यांमध्ये चित्रित केले आहेत. ज्यामध्ये ३०० हून अधिक पुतळे उभारलेले आहेत जे महाराष्ट्रातील बलुतेदारी पद्धतीचे आणि पूर्वीच्या गावगाड्याचे अत्यंत प्रभावी आणि सुंदर चित्रण करतात.१

**म्युझियम उभारणी मागील हेतू :-**

सिद्धगिरी मठाचे अठ्ठेचाळीसावे मठाधिपती श्री. काडसिद्धेश्वर महाराज यांची सर्वसामान्य लोकांना परवडेल असे अद्ययावत हॉस्पिटल उभारले जावे अशी इच्छा होती. त्यांच्या मागे ती इच्छा श्री. अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांनी पूर्ण करण्याचे ठरवले. मिळालेल्या देणगीतून

हॉस्पिटल उभारण्याचे काम सुरु झाले. पण आर्थिक अडचणी मिटेनात. त्यातूनच मठाला स्वावलंबी करण्यासाठी उपाय म्हणून सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियमची संकल्पना राबवण्यात आली.२

**उद्दिष्टे :-**

प्राचीन भारतीय संस्कृती, व्यवसाय – परंपरा यांचे जतन व नवीन पिढीला ओळख करून देणे.

प्राचीन भारतातील विवीध ऋषीमुनी, त्यांची कामे व माहिती करून घेणे.

महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाविषयी माहिती करून घेणे.

प्राचीन भारतीय संस्कृतीची ओळख अ माहिती करून घेणे.

**महत्व :-**

सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम आधारे आपणास स्वयंपूर्ण ग्रामजीवनाचा वारसा पहायला मिळतो. या म्युझियमच्या संकल्पनेतून गावातील विविध कारागीर व त्यांचे लोकजीवनातील असणारे महत्व अभ्यासता येते. म्युझियम मधील विविध कलाकुसर व जिवंत शिल्पे यांची प्रत्यक्ष पाहणी करता येते. भारतातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनाविषयी माहिती मिळते. सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम हे निसर्गाच्या सानिध्यात वसलेले एक उत्कृष्ट पर्यटनाचे ठिकाण पाहायला मिळते.

**सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम :-**

म्युझियमच्या प्रवेशद्वारापाशी श्री. काडसिद्धेश्वर महाराजांची सुंदर अशी मूर्ती आहे. म्युझियम आत मध्ये तीन विभागात विभागलेले पाहायला मिळते. पहिला विभाग- प्राचीन प्रतिभावंत, दुसरा- ग्रामजीवन, तिसरा-उत्सव.३

पहिला विभाग – प्रतीभावंत

म्युझियमचा जो पहिला टप्पा आहे तो गुहेतून बनवला गेला आहे. गुहेमध्ये प्राचिन ऋषीमुनी आणि रामायण – महाभारतातील काही प्रसंग उभे केले आहेत. त्यात

ऋषीमुनी त्यांचे योगदान व प्रसंगाची माहिती दिली आहे. त्यामध्ये वैदिक ऋषी कपिलमुनी, पतंजली (योगदर्शनाचे प्रणीत), वेद व्यास (महाभारताचे रचित),महर्षी कणाद (अनुची संकल्पना मांडणारे), नारदमुनी, भगीरथ, चिरकारिक (गौतम ऋषी आणि मेधावती यांचा पुत्र), विष्णु शर्मा (पंचतंत्र ग्रंथाचे लेखक), गार्गी(वैदिक वाड्मयातील एक तत्वज्ञानी), अक्षपाद गौतम (न्यायसुत्राचा कर्ता), जैमिनी (वेदव्यासांचे शिष्य व पूर्वमिमांसेचा कर्ता), महर्षी वाल्मीकि (रामायणाचे रचिते), राजा हर्षवर्धन, विद्यावाचस्पती, भरत (शकुंतला व दुष्यंत यांचा पुत्र), भरतमुनी (भारतीय नाट्यशास्त्राचे जनक), पाणिनी, एकलव्य (द्रोणाचार्यांची मूर्ती तयार करून धनुरवीदयेचा अभ्यास करणारा), शबरी (प्रभू रामचंद्रांच्या वाटेवर नजर रोखून बसणारी), सुरपाल, श्री कृष्ण व यशोदा, महर्षी पराशर आर्य चाणक्य (अर्थशास्त्रज्ञ), महर्षी काश्यप, चरक (चरकसंहिता ग्रंथाचे लेखक),

सुश्रुत (शस्त्रक्रियेचे जनक व सुश्रुतसंहिता ग्रंथाचे लेखक), जीवक (मेंदूशस्त्रक्रियेत प्रवीण), आर्यभट्ट (शून्याचा शोध), नागार्जुन(नालंदा विद्यापीठाचे कुलगुरू), उभयभारती, भास्कराचार्य (जोतीष्य शास्त्रज्ञ

यासारख्या विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या बत्तीस महान ऋषींच्या सिमेंट च्या तयार केलेल्या मूर्ती अगदी हुबेहूब व आकर्षण दिसतात प्राचीन इतिहासाच्या एक नजारा पटच डोळ्यासमोर उभा राहतो. मूर्तीबरोबरच त्यांची केलेल्या कार्याची माहिती देण्यात आली आहे. तसेच मूर्तींच्या आजूबाजूला निरनिराळी योगासने वेगवेगळ्या भागात शिल्पस्वरुपात कोरलेली आहेत.४

दुसरा बिभाग:- ग्रामजीवन

गुहेतून बाहेर आल्यानंतर आदर्श गावाचा देखावा पाहायला मिळतो. त्यात शंभर वर्षापूर्वीच्या ग्रामजीवनाच्या पद्धतीत केंद्रस्थानी असणारा शेतकरी व इतर सेवा पुरवणारे बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार आहेत. म्युझियमच्या ग्रामजीवन या विभागात गावच्या पाणवठ्यावर राहाटाच्या मदतीने विहिरीतून पाणी काढणाऱ्या बायका व गावकरी, गावाबाहेरील गायरानात विटीदांडू खेळणारी मुले, गाई-म्हशी राखणारा गुराखी, मेढपाळ, काठी अन घोंगडे घेऊन शेळ्या राखणारा धनगर, वट्यांचा खेळ, बैलगाडी सावलीत लावून विश्रांतीसाठी थांबणारे प्रवासी, चुनाभट्टी, पेरणी करणारे शेतकरी, कुलवट करणारे शेतकरी, धान्याची मळणी, धान्याला वारा देणारे शेतकरी, कोळपणी व नांगरणी करणारे शेतकरी असे ग्रामीण जीवनाचे चित्रमय दर्शन घडते. त्याचबरोबर औताला जुपलेली बैलगाडी व काम करणारा शेतकरी, मोटेच्या साह्याने शेताला दिले जाणारे पाणी, पान्व्त्यावर पाणी भरणाऱ्या स्त्रिया, पाण्याची कावड घेऊन जाणारे गावकरी, गावच्या पारकट्यावर बसून न्यायनिवाडा करणारी न्यायपंचायत, गावातील सर्वात मोठ आकर्षण गावच्या पाटलाचा वाडा,शाळेला जाणारी मुले आपणास पहायला मिळतात.

मुख्य गावात प्रवेश करत असताना लमाणी लोकांचे घर, कसरत करणारे पैलवान, गावातील हनुमान मंदिर व मंदिरातील प्रवचन, माकडवाला मदारी, वासुदेव, गावात असलेला सोमवार कट्टा, अस्वलाचा खेळ, गावतील धर्मशाळा, चुनाभट्टी, विठ्ठल मंदिर व भजन करणारे गावकरी, शिंग फुंकणारा, पावश्या, गावातील गावचावडी, सापांचा खेळ दाखवणारा गारुडी, माळी कुटुंब, कोंडवाडा, सुतार काम करणारे सुतार काम करणारे सुतार, लोहारचे घर, गोट्यांचा खेळ खेळणारी मुले, तांबट कुटुंब, गादी बनवणाऱ्या पिंजारीचे घर, पत्रावळी तयार करणारे गुरव, कोरवी कुटुंब, खड्यांचा खेळ खेणाऱ्या मुली, कातडी कमावणारा, मातंग (दोरखंड बनवणारा),पाथरवट, कोळ्यांचे घर, कुंभाराचे घर, लगोरीचा खेळ खेळणारी मुले, लाकुडतोड्या, पखाली, फुगडी खेळताना मुली व स्त्रिया,कोष्टयाचे घर, पिंगला जोशी, तेल्याचे घर, वाण्याचे दुकान, सोनाराचे घर, अत्तराचे घर, वैद्याचे घर, जोशीचे घर, वंशावळ सांगणारा हेळवी, बांगड्या भरणारी कासारीण, कोकणातील घर, बाळतीणीची खोली, धोबीण, न्हावी, गावात मंदिरात भरणारी शाळा, गावातील बाजार कट्टा, इस्त्री करणारा परीट, शेवया करणाऱ्या स्त्रिया, वतनदारांचा वाडा, गवंडी, डोंबारी खेळ,अश्या वास्तुशिल्पामधून ग्रामीण समाजव्यवस्थेचे चित्रण करण्यात आले आहे. पूर्वापार चालत आलेले व्यवसाय, कारागीर, मुलांचे खेळ या विभागात उभे करण्यात आले आहेत.५

तिसरा विभाग:- उत्सव

हा विभाग स्वतंत्र आहे. यामध्ये बाजरपेठ -कपडे, अवजारे, भांडी, फळे, चादरी, घोंगडी, वाद्ये, बांगड्या, लाकडी खेळणी, मिठाई व खाद्यपदार्थ, देवीदेवतांच्या मूर्ती, पूजेचे साहित्य इत्यादीची दुकाने, विविध सांस्कृतिक खेळ, बासरीवाला, गजरा विकणारा, फुगेवाला, शहरातून गावात यात्रा बगायल आलेले कुटुंब, सगळयात आकर्षक असणारा यात्रेतील रथ व तो ओढणारे सर्व लोक हे दृश्य अगदी मोहक आहे. यातून सामाजिक बांधिलकी व एकोप्याचे दर्शन घडते. यातून प्राचीन समृद्ध खेडी व आदर्श जीवन पद्धती दिसून येते.६

**सारांश:-**

सिद्धगिरी मठातील सगळ्यात मोठे आकर्षण म्हणजे सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम होय. हे शंभर वर्षापूर्वीच्या स्वावलंबी व आदर्श जीवनपद्धती दाखवण्याचे काम या म्युझियम च्या मार्फत केले आहे. प्राचीन ऋषीमुनी त्यांचे योगदान, वैद्यकीय शेत्रातील त्यांचे

महत्व, गुरुशिष्य संबंध या म्युझियम द्वारे पाहायला मिळते. पूर्वीची खेडी अतिशय समृद्ध आणि स्वावलंबी होती. गावातील लोकांमध्ये आपापसात प्रेम, आस्था, जिव्हाळा, आपुलकी होती. त्या काळात देश जरी पारतंत्र्यात असला तरी खेडी ही स्वतंत्र होती. लोकांना आपल्या गरजा भागवण्यासाठी गाव सोडून इतरत्र जाण्याची गरज नव्हती. त्यांच्या गरजा गावातल्या गावातच पूर्ण केल्या जात. प्राचीन खेड्यामध्ये शेती हा केंद्रबिंदू होता. तेथील लोक सुख, समाधानी जीवन जगत होते. अलुतेदार व

NAVJYOT / Vol. XV / Issue – II ISSN 2277-8063

बलुतेदार यांच्याभोवती लोकजीवन फिरत होते त्याचे प्रत्यक्ष दर्शन या या सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम कणेरी मठामध्ये पाहायला मिळते. त्यातील शिल्पाकृतीमुळे देखावा जीवंत व सजीव वाटतो आणि मनाला भावतो.

**संदर्भ ग्रंथ:-**


१ – introduction of shree kshetra siddhagiri sansthan math kaneri, shree kshetra siddhagiri math, kaneri.

२ – श्री. अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांची abp माझा वर घेतलेली मुलाखत, ३१ ऑक्टोबर २०१७.

३ – सिद्धगिरी मठ कार्यालयातून मिळालेली माहिती व कागदपत्र.

४ – सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम कणेरी मठास प्रत्यक्ष भेट १५ फेब्रुवारी २०२६.

५ – महाराष्ट्र टाइम्स, सिद्धगिरी म्युझियम 'टॉप टेन मध्ये, २० सप्टेंबर २०२६.

६ – तरूण भारत, कोल्हापूर टुरिझम, २८ मे २०२२.

७ - पुढारी, दोन हजार वर्षाचा इतिहास जपणारी कोल्हापुरातील संग्राहालये, १८ मे २०२२.

८ – सिद्धगिरी ग्रामजीवन म्युझियम कणेरी मठास प्रत्यक्ष भेट

९ – https://en.wikipedia.org

१० – https://sidhagirimatham.org